॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Phone : (02462) 215525 DEPARTMENT OF STUDENTS DEVELOPMENT Website: srtmun.ac.in

Fax : (02462) 215572 E-mail: dir.dsd@srtmun.ac.in

जा.क्र./वि.वि.वि/२०२६–२७/१३६ दिनांक : ०७/१०/२०२६

<u>अत्यंत महत्त्वाचे व तातडीचे</u>

प्रति,
मा. प्राचार्य/सांस्कृतिक विभागप्रमुख/संघव्यवस्थापक,
सर्व सलंग्नित महाविद्यालये
प्रस्तुत विद्यापीठ

विषय: आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव 'ज्ञानतीर्थ २०२६' च्या लॉटस संदर्भात बैठकीबाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२६–२७ चा आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव **'ज्ञानतीर्थ –२०२६'** नांदेड एज्युकेशन सोसायटीने सायंन्स कॉलेज नांदेड येथे **दि. १६ ते १९ ऑक्टोबर, २०२६** या दरम्यान आयोजित करण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने सहभागी महाविद्यालय कलाप्रकार सादरीकरणाचा क्रम ठरविण्यासाठी लॉट्स पाडून वेळाप्रत्रक तयार करणे आवश्यक आहे.

या संदर्भात सांस्कृतिक समन्वयकांची बैठक सोमवार दिनांक १२ ऑक्टोबर, २०२६ रोजी सकाळी ११.३० वा. प्रस्तुत विद्यापीठाच्या मा. अधिसभा सभागृह (सिनेट हॉल) येथे आयोजित करण्यात आली आहे. तरी सदरील बैठकीस महाविद्यालयाचे प्राचार्य/ सांस्कृतिक विभागप्रमुख/ संघव्यवस्थापक/ संघव्यवस्थापिका यांच्यापैकी किमान एकाने बैठकीस उपस्थित रहावे, ही विनंती.

सदरील बैठक ही युवक महोत्सवात सहभागी महाविद्यालयाच्या लॉट्स आणि सादरीकरणासंदर्भात असल्याने बैठकीस उपस्थित राहणे अनिवार्य आहे. प्रस्तुत बैठकीस उपस्थित असणाऱ्या सांस्कृतिक समन्वयकांच्या समक्ष पाडण्यात आलेले लॉटस प्रवेशित सर्व महाविद्यालयाच्या संघांसाठी अंतिम असतील. लॉट्स पाडून वेळापत्रक अंतिम केल्यानंतर आपली कोणतीही तक्रार ऐकूण घेतली जाणार नाही.याची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

टिप: सदरील बैठकीस उपस्थित सांस्कृतिक विभागप्रमुख/संघव्यवस्थापक/संघव्यवस्थापिका यांचा प्रवासखर्च व दैनिक भत्ता संबंधीत महाविद्यालयांनी अदा करावा.

डॉ. राजपालसिंह चिखलीकर
संचालक,
विद्यार्थी विकास विभाग.

प्रत महितीस्तव :

सीस्टीम एक्सपर्ट, (संगणक विभाग) सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव 'ज्ञानतीर्थ – २०२६'संदर्भात सांस्कृतिक विभागप्रमुखांच्या बैठकीबाबत या शिर्षकाखाली विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील Home Page मधील Administration आणि Students Development सदराअंतर्गत प्रसिध्द करावे.

विद्यार्थी विकास विभाग • स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड • स्थापना १७/९४

Scanned with OKEN Scanner